**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416004, MAHARASHTRA**
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर–416004 महाराष्ट्र
Estd. 1962
NAAC 'A' Grade
MHRD NIRF-28th Rank
PHONE: EPABX – 0091-0231-2609000
B.A. Exam. Section: 0231-2609116
Website: www.unishivaji.ac.in
CoE Office: 0231-2609067
E-mail: ba.section@unishivaj.ac.in

संदर्भ क्र: शिवाजी वि/परीक्षा/डीवायआर.ऑन/ 3330 दिनांक - 12/10/2017

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक
संलग्नित महाविद्यालये आणि मान्यता प्राप्त परिसंस्था

विषय – अंतर्गत/सत्रकर्म/प्रात्यक्षिक/गुणांची डाटा एंट्रीसाठी प्रणाली उपलब्ध करुन देणेबाबत.

महोदय/महोदया,

आपणांस कळविण्यात येते की, आक्टोबर २०१७ मध्ये होणा-या भाग- १ ते ३ सत्र- १ ते ६ चे परीक्षांचे संपूर्ण कामकाज विद्यापीठ पोर्टलवर होणार आहे. online.unishivaji.ac.in या लिंक मधून प्रथम वर्षाच्या कार्यप्रणालीप्रमाणेच सत्र ५ टर्मवर्क मधून टर्मवर्कचे गुण भरावयाचे आहेत. या अनुषंगांने खालील बाबींचे काटेकोर पणे पालन करणे आवश्यक आहे.

अ) अंतर्गत/सत्रकर्म(टर्मवर्क)/प्रात्यक्षिक/ शारीरिक शिक्षण गुणांची डाटा एंट्री :

१. ज्या अभ्यासक्रमांना अंतर्गत/सत्रकर्म(टर्मवर्क)/प्रात्यक्षिक/शारीरिक शिक्षण गुण आहेत अशा परीक्षांचे अंतर्गत/ सत्रकर्म/प्रात्यक्षिक शारीरिक शिक्षण गुण भरण्यासाठी संबंधित पोर्टलवर प्रणालीद्वारे सुविधा करुन देण्यात आली आहे. दुरशिक्षण प्रणाली मधील विद्यार्थ्यांचे सदरचे गुण संबधित अभ्यासकेंद्रांनी (स्टडी सेंटर्स) भरावयाचे आहेत.

२. सदर प्रणाली उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. महाविद्यालयातील संबधितानी अंतर्गत/सत्रकर्म/प्रात्यक्षिक चे गुण ऑनलाईन पध्दतीने खालील तारखांपर्यत भरुन जमा करावेत.

| अनुक्रमांक | अभ्यासक्रम/परीक्षा | टर्मवर्क गुण भरण्याचा अंतिम दिनांक | टर्मवर्क ई-मार्कलिस्ट जमा करण्याचा अंतिम दिनांक |
|---|---|---|---|
| १ | बी. ए. | ०४/११/२०१७ | १०/११/२०१७ |
| २ | बी. एस्सी. | २५/१०/२०१७ | ३१/१०/२०१७ |

...२/-

गुण ऑन लाईनच भरणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी. दूरशिक्षण प्रणालीच्या विद्यार्थ्यांबाबत सदरची प्रत दुरशिक्षण केंद्राच्या संबंधित समन्वयकांकडे जमा करावयाची आहेत.

३. निर्धारित तारखेनंतर आलेले गुण कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत. अशा सुचना सर्व संबंधितांना देण्यात याव्यात. गुण भरण्याची ऑनलाईन सुविधा निर्धारित तारखेस बंद झाल्यानंतर ती पुन:श्च उपलब्ध करुन देता येणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

४. ऑक्टोबर २०१७ पासून एम.के.सी.एल प्रणालीतील विद्यार्थी ऑनलाईन प्रणालीत वर्ग करण्यात आले आहेत. त्यापैकी ज्या विद्यार्थ्यांचा डाटा वर्ग झाला आहे अशा विद्यार्थ्यांचे गुण ऑनलाईन भरावयाचे आहेत. ज्या विद्यार्थ्यांचा डाटा वर्ग झालेला नाही किंवा डाटाबेस मध्ये बैठक क्रमांक आलेला नाही पण विद्यार्थ्याने टर्मवर्क पूर्ण केला आहे अशा विद्यार्थ्यांचे गुण न विसरता त्या त्या विषयाच्या ऑनलाईन गुणतक्त्यामध्ये लिहावेत.

कृपया मा. प्राचार्य/संचालक/अधिविभागप्रमुख यांनी वरील माहिती सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून त्याप्रमाणे कार्यवाही करून घ्यावी व परीक्षा आणि निकालाचे कामकाज सुरळीतपणे पार पाडण्यासाठी प्रशासनास सहकार्य करावे ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

प्रत :-

१ संचालक/उपकुलसचिव दुरशिक्षणकेंद्र
२ सर्व विभाग प्रमुख व उपकुलसचिव/सहा.. कुलसचिव.
३ आय. टी. विभाग
यांना माहितीसाठी पुढील कार्यवाहीसाठी.